दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक
# वादळ वार्ता

vadalvartanews@gmail.com
संपादक : अजय भांगे
https://epaper.vadalvarta.com

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी | शनिवार दि.८ नोव्हेंबर २०२५ | 9422660077 | आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ | वर्ष ३ रे | अंक ७८ | पाने ४ | किंमत ४ रुपये

Beed (Mahmar) Daily Marathi | Saturday 8 Nov 2025 | 9422660077 | RNI-MAHMAR / 2023 / 87555 | Year - 3rd | Issue 78 | Pages 4 | Rate 4 Rs

## सगळ्यांवर हा एफआयआर दाखल

**मुंबई**–तसेच देवेंद्र फडणवीस यांनी अभय दिले असल्याचे बोलले जात आहे. यावर पत्रकारांनी प्रश्न विचारला असता देवेंद्र फडणवीस म्हणाले, ज्यांना एफआयआर काय असतो हे समजत नाही, असेच लोक अशा प्रकारचा आरोप करू शकतात. एफआयआर दाखल करत असताना ज्या एक्सप्रेस पार्टीज असतात त्यांच्यावर गुन्हा दाखल होतो. यात जी कंपनी आहे, या कंपनीचे जे अधिकृत सिग्नेटरीज आहेत त्यांच्यावरच गुन्हा दाखल होऊ शकतो. पण लक्षात घेतले पाहिजे, ज्यावेळेस एखादा एफआयआर होतो त्यावेळेस ज्यांनी सही केले ते, ज्यांनी विक्री केली ते, ज्यांनी फेरफार केला ते, ज्यांनी चुकीचे रजिस्ट्रेशन केले ते, अशा सगळ्यांवर हा एफआयआर दाखल केलेला असल्याची माहिती फडणवीस यांनी दिली आहे.

## खोटे आरोप करून डीएमला संपवायचं स्वप्न कोणीही पाहू नये

# डीएमला जनतेच्या मनातुन उतरवणं; हे कोणालाही शक्य नाही

### जरांगेंच्या आरोपांवरून धनंजय मुंडेंची थेट सीबीआय चौकशीची मागणी, माझ्यासह सर्वांचीच नार्को सह ब्रेन मॅपिंग टेस्ट करा

### ऑन एअर आम्हाला संपवून टाकण्याची भाषा करतात, तेव्हा सरकार कारवाई का करत नाही–मुंडेंचा सवाल

### संपवायची भाषा सोडा, आरक्षणाच्या मुद्द्यावर चर्चेला बसू–मुंडेंचे जरांगेंना आव्हान

### मनोज जरांगे यांना धनंजय मुंडे या पृथ्वीतलावरच नको आहे–धनंजय मुंडे



**मराठा आंदोलक मनोज जरांगे यांनी आपल्यावर माजी मंत्री तथा आमदार धनंजय मुंडे यांच्यामार्फत घातपात केला जात असल्याचा आरोप केल्यानंतर धनंजय मुंडे यांनी त्यास प्रत्युत्तर देत थेट आरोप करणारे जरांगे, आरोपी आणि माझी स्वत:ची देखील थेट सीबीआय मार्फत चौकशी केली जावी, त्याचबरोबर अशा प्रकारच्या आरोपांची सत्यता पडताळून सत्य महाराष्ट्राच्या जनतेच्या समोर यावे यासाठी ब्रेन मॅपिंग व नार्को टेस्ट करावी, असे आवाहन धनंजय मुंडे यांनी आज पत्रकार परिषदेत केले आहे.मनोज जरांगे यांनी जे आरोपी म्हणून पुढे केले आहेत, ते त्यांचेच अनेक वर्ष जुने सहकारी आहेत. त्यातल्या एकावर मागील वर्षी एप्रिल महिन्यात हल्ला झाला तेव्हा जरांगेंनी त्याला पोलीस संरक्षण देण्याची मागणी केली होती, म्हणजे आपलेच जवळचे लोक पाठवायचे त्यांना कुणाच्या तरी मार्फत ओळख करून घ्यायला लावायचे, काहीतरी फेक रेकॉर्ड वगैरे बनवायचे आणि आरोप करून खळबळ उडवून एखाद्याची प्राणांतिक बदनामी करायची, हा कावा आता ओळखला आहे, त्यामुळे जरांगे यांनी केलेले आरोप म्हणजे निव्वळ थोतांडगिरी आहे असाही प्रत्यारोप धनंजय मुंडे यांनी केला आहे.मी मागील ३० वर्षांपासून समाजकारण आणि राजकारणामध्ये सक्रिय आहे. माझ्या समाजापेक्षा मराठा समाजात माझे मित्र व सहकारी जास्त आहेत, पहिल्यापासून मराठा समाजाच्या आरक्षणाच्या प्रत्येक लढ्यात मी बरोबरीने सहभाग घेतला. मात्र प्रथमच ओबीसी महा एल्गार मेळाव्यातून मी इडब्लूएस आरक्षण कसे अधिक फायद्याचे आहे यावरून बोललो तसेच ओबीसींच्या हक्कांचे संरक्षण करण्याच्या बाबतीत बोललो, तेव्हापासून मला कामापेक्षा जास्त टार्गेट केले जात आहे. ओबीसींच्या न्यायाची आणि गरजू व गरीब मराठा विद्यार्थ्यांची वैचारिक बाजु मांडली म्हणून मला संपवायला निघालेत, असा थेट आरोप धनंजय मुंडे यांनी केला.**

दैनिक वादळ वार्ता
**बीड । प्रतिनिधी**

आज घात पाताच्या गोष्टी करणाऱ्यांनी माणसात माणूस ठेवला नाही. झुंड आणि दादागिरी करून राज्याच्या मुख्यमंत्री महोदयांना शिव्या, भुजबळ साहेबांना शिव्या, मला शिव्या, पंकजाताई ला शिव्या, लक्ष्मण हाकेंवर हल्ला, नवनाथ वाघमारे यांच्या वर हल्ला, त्या पवन करवरचा तर जीव घ्यायला निघाले होते, ते कुणाचे समर्थक होते? जीवघेणे हल्ले करून त्याचे समर्थन करत मारहाणीचा असुरी आनंद घेणारे लोक तुमचेच होते, असा घणाघात करत धनंजय मुंडे यांनी आणखी एक मुद्दा उपस्थित केला. मनोज जरांगे ऑन एअर धनंजय मुंडे संपवून टाकतो, त्याचा नायनाट करतो, त्याची संपूर्ण जात संपवून टाकतो, ओबीसी नेत्यांना संपवून टाकतो, ब्राम्हणांना संपवून टाकतो, अशी उघड धमकी दिली जाते, ही धमकी नाही का? त्यावर सरकार कारवाई करणार नाही का? सरकार त्यांचे सर्व काही ऐकते मग आम्ही ओबीसी म्हणून आम्हाला किंमत नाही का? असा सवाल करताना धनंजय मुंडे यांनी जरांगेना आव्हान देत मला गोळ्या घालून मारून टाका, माझा समाज, ओबीसी समाज सगळ्यांना गोळ्या घालून मारून टाका आणि तुम्ही एकटेच राज्य करा, असे भावनिक आवाहन केले.

छत्रपती शिवाजी महाराजांनी घालून दिलेला गावगाडा, सामाजिक विन विस्कटनार नाही यासाठी अनेकवेळा आरोप होऊन देखील मी गप्प राहिलो, जरांगे यांना सरकारचा प्रतिनिधी म्हणून दोनदा भेटलो, पण कधीच त्यांना कुठे विरोध केला नाही, विरोध हा केवळ आरक्षणाच्या विचारापुरता मर्यादित होता मात्र मनोज जरंगे या व्यक्तीला धनंजय मुंडे हा व्यक्ती पृथ्वीतलावर जिवंत नको आहे असे वाटते असे धक्कादायक विधान धनंजय मुंडे यांनी केले. त्याचबरोबर मनोज जरांगे आणि त्यांच्या वाळू माफिया टोळी कडून आपल्याही जीवाला धोका असल्याचे धनंजय मुंडे यांनी यावेळी म्हटले.मनोज जरांगे यांना काही नेत्यांनी झेड प्लस दर्जाची सुरक्षा देण्याची मागणी केली आहे, मी तर या पत्रकार परिषद व्दारे या संपूर्ण प्रकरणाची सीबीआय चौकशी करण्याबरोबरच देशातील सर्वात सेफ समजली जाणारी एसपीजी सुरक्षा जरांगेना द्यावी, अशी मागणी सरकारकडे करतो, सोबतच ओबीसी समाजाच्या लढ्यातील छगन भुजबळ साहेब, गोपीचंद पडळकर साहेब, लक्ष्मण हाके, नवनाथ वाघमारे, किंवा माझ्यासारखा सामान्य कार्यकर्ता अशा लोकांचे जीव वाचावेत, याचीही काळजी सरकारने घ्यावी आणि राहिला विषय मला संपवायचा तर इथल्या मातीतील लोकांच्या पदरी माझ्या आई वडिलांनी मला वाहिलेले आहे, त्यामुळे लोकांच्या मध्ये राहून माझा जीव गेला तरी मला फरक पडत नाही, असे भावनिक विधान धनंजय मुंडे यांनी केले आहे.

## प्रभाकर कुलकर्णी सारणीकर यांचा अमृत महोत्सव ७५ वा वाढदिवस साजरा आपल्या गावी करणार

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

केज तालुक्यातील सारणी सांगवी या गावातील प्रभाकर जनार्दन कुलकर्णी यांच्या ७५ वाढदिवसाच्या निमित्ताने सारणी या गावी कीर्तन भजन जागरण तुला व गाव जेवण असा भरगच्च कार्यक्रम ठेवण्यात आलेला आहे या कार्यक्रमानिमित्त सर्व आप्तसोकीय व मित्रपरिवार उपस्थित राहणार आहे. केज तालुक्यातील सारणी सांगवी या गावचे मूळ रहिवासी प्रभाकर जनार्दन कुलकर्णी यांचा अमृत महोत्सव ७५ वा वाढदिवसाच्या निमित्ताने शनिवार दिनांक ८ नोव्हेंबर रोजी ह भ प जगन्नाथ महाराज जोशी रामगड गाव यांचे प्रवचन सायंकाळी पाच ते सहा हरिपाठ भजनी मंडळ सारणी सांगवी सायंकाळी सहा ते सात ह भ प लक्ष्मण महाराज चव्हाण सोलापूर यांचे कीर्तन रात्री आठ ते दहा तर रविवार दिनांक ९ ११ २०२५ रोजी गावातल्या देवतांना अभिषेक सकाळी नऊ ते दहा होम हवन सकाळी दहा ते बारा तुला दुपारी बारा ते एक आणि भोजन दुपारी दोन ते सात पर्यंत असा भरगच्च कार्यक्रम ठेवण्यात आलेला आहे प्रभाकर कुलकर्णी यांचे बालपण अतिशय कष्टात गेलेले असून त्यांनी सोलापूर येथील किर्लोस्कर कंपनी येथे कामगार म्हणून काम केले विठ्ठलावर भक्ती आणि भानुदास सद्गुरु भानुदास महाराज यांच्या कृपाशीर्वादाने सर्व काही चांगले झाले असल्यामुळे सोलापूरहून पुण्याला स्थायिक झाले मुलांचे वगैरे सगळे चांगले झाल्यानंतर अमृत महोत्सव निमित्त ७५ वा वाढदिवस गावाकडे साजरा करावा तसेच आपल्या पत्नीचा ७१ वा वाढदिवस देखील साजरा करावा या हेतूने गावातील आपला मित्र परिवार तसेच आप्तसोकीय व गावातील सर्वांनी या कार्यक्रमात सहभागी व्हावे यासाठी त्यांनी आवाहन केले. आपली गावाकडली नाळ कधीही तुटू दिली नाही नियमित पणे दरवर्षी हनुमंत पिंपरी येथील यात्रेला येत राहिले सर्व भावाची लग्ने बहिणीचे लग्न त्यांनीच करून दिले व तेही गावीच. अतिशय कठीण काळातही आपली वडिलोपार्जित जमीन जोपासली आणि कष्ट करून पाच भाऊ व तीन बहिणी आई या सर्वचे सर्व व्यवस्थित करून दिले. आयुष्य हे संपूर्ण कष्टात जाऊन देखील आपला अमृत महोत्सव वाढदिवस आपल्या गावीच करायचा असे ठरवून गावातील सर्व मित्र परिवार नातेवाईक मूल जावई नातवंड यांच्या सोबत करून सगळ्यांना आनंदी करण्याचा प्रयत्न करायचा आपले गाव हे आपले गाव असते हिच यामागची भावना



## गुलाबराव पाटील यांची तुफान फटकेबाजी ज्यावर केस नाही, तो शिवसैनिक नाही

दैनिक वादळ वार्ता
**मुंबई (वृत्तसंस्था)**

राज्याचे मंत्री आणि शिवसेना नेते गुलाबराव पाटील यांनी पुन्हा एकदा त्यांच्या बेधडक बोलण्यामुळे सगळ्यांचे लक्ष वेधून घेतले आहे. खासदार श्रीकांत शिंदे यांच्या उपस्थितीत झालेल्या सभेत त्यांनी थेट अधिकाऱ्यांनाच लक्ष्य केले. बताओ कलेक्टर बडा है, या गुलाबराव पाटील बडा है? असं म्हणत त्यांनी प्रशासनावर जोरदार टीका केली. सरकार दोन गोष्टींवर चालते, जीआरवर आणि सीआरवर, आणि आम्ही जीआरही काढतो आणि तुमचा सीआरही काढतो, असं म्हणत त्यांनी आपली ताकद दाखवली. या वक्तव्यावरून आता राजकीय वर्तुळात मोठी चर्चा सुरू झाली आहे.गुलाबराव पाटील म्हणाले की, मी बारावीपर्यंत शिकलो, कॉलेजला गेलो नाही. पण बाळासाहेब ठाकरे यांनी माझ्यावर विश्वास ठेवून मला विधानसभेचे तिकीट दिलं. आज मी मंत्री आहे. त्यामुळे शिक्षणापेक्षा माणसातली जिद्द आणि प्रामाणिकपणा महत्त्वाचा आहे. ते म्हणाले की, आमच्यावर केस झाली नाही तर आम्ही शिवसैनिक नाही, अशी आमची संकल्पना होती. एका प्रकरणात मी, माझा लहान भाऊ, मोठा भाऊ आणि माझा वडील, सगळे एकाच बॅरेकमध्ये होतो. त्यांच्या या आठवणींवर उपस्थितांमध्ये हशा पिकला.



**राऊत डमिट आहेत, ते वाचले पाहिजेत**

यानंतर त्यांनी शिवसेना ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांच्याबद्दलही भाष्य केले. संजय राऊत डमिट आहेत. ते वाचले पाहिजेत. मी देवाला प्रार्थना केली आहे की त्यांना सद्बुद्धी देवो, असं म्हणत त्यांनी राऊत यांच्याविषयी मिश्र भावना व्यक्त केल्या. वो मेरा माल है भाई, माल है, असं म्हणत त्यांनी आपली शैली कायम ठेवली. त्याचबरोबर त्यांनी उद्धव ठाकरे यांनाही टोला लगावला. देवाने उद्धव ठाकरेंसोबत राहिलेल्या २० लोकांना बुद्धी दिली, तर ते तिथे टिकतील, असही ते म्हणाले.

## ८ नोव्हेंबरला बेतिया येथे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची विराट सभा

दैनिक वादळ वार्ता
**बेतिया । प्रतिनिधी**

बिहार विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर ८ नोव्हेंबर रोजी बेतिया येथे देशगौरव पंतप्रधान मा. नरेंद्रजी मोदी यांची होत असलेली विराट सभा म्हणजे केवळ राजकीय कार्यक्रम नसून सर्वसमावेशक विकासाचा दृढ संदेश देणारी आणि राष्ट्रभावनेची स्फूर्ती जनतेच्या मनामनांत जागवणारी ऐतिहासिक सभा ठरणार असल्याचा ठाम विश्वास महाराष्ट्राचे माजी वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्यव्यवसाय मंत्री तसेच भाजपचे ज्येष्ठ नेते आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी व्यक्त केला.

बेतिया, बिहार येथे ८ नोव्हेंबर रोजी कुडिया कोटी, चनपटिया प्रखंड येथे विधानसभा निवडणुकीच्या प्रचारार्थ देशगौरव पंतप्रधान मा. श्री. नरेंद्रजी मोदी यांच्या विराट जनसभेचे आयोजन करण्यात आले आहे. या ऐतिहासिक सभेच्या सर्वांगीण पूर्वतयारीसाठी हॉटेल किसन, बेतिया येथे महत्त्वपूर्ण नियोजन बैठक दिनांक ५ नोव्हेंबर रोजी संपन्न झाली. या बैठकीला महाराष्ट्राचे माजी वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्यव्यवसाय मंत्री तसेच भाजपचे ज्येष्ठ नेते आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी मार्गदर्शन लाभले. बैठकीत सभास्थळाची सजावट, मंचनिर्माण, प्रशासनिक समन्वय, वाहतूक व पार्किंग व्यवस्था, महिला विभागाचे नियोजन, जनसंपर्क मोहिम, सोशल मीडिया प्रचार, आरोग्य सुविधा, हेलिपॅड व ग्रीनरूम व्यवस्थापन अशा सर्व बाबींवर सखोल चर्चा करण्यात आली. प्रत्येक विभागाला स्पष्ट जबाबदाऱ्या देत काम वेळेत आणि काटेकोरपणे पूर्ण करण्याचे निर्देश देण्यात आले.यावेळी बोलताना आ. मुनगंटीवार म्हणाले, देशगौरव पंतप्रधान मोदीजींचे नेतृत्व म्हणजे विकासाचा वेग, राष्ट्रोन्नतीचा मार्ग आणि भारताच्या स्वाभिमानाचे प्रतीक आहे. आगामी सभा ही केवळ सभा नसून जनतेच्या मनात राष्ट्रभावनेची नवी ऊर्जा जागवणारा क्षण ठरेल. 'काँग्रेसमुक्त भारत' हाच आजचा एक संकल्प आहे, असे आ. मुनगंटीवार म्हणाले. त्यांनी काँग्रेसच्या महागठबंधनावर टीका करत त्याला 'महा-ठगबंधन' असे संबोधले व कार्यकर्त्यांना जनतेशी व्यापक संवाद साधण्याचे आवाहन केले.या बैठकीस माननीय खासदार डॉ. संजय जयस्वाल, केंद्रीय ग्रामीण विकास राज्यमंत्री कमलेश पासवान, उत्तर प्रदेश सरकारचे आयुष राज्य मंत्री दयाशंकर मिश्र 'दयालु', माजी उपमुख्यमंत्री व आमदार रेणू देवी, भाजप नेते शिवेश कुमार, जिल्हाध्यक्ष रूपक श्रीवास्तव, उपजिल्हाध्यक्ष मनोज सिंह, एनआरआय प्रकोष्ठ बिहार प्रभारी आनंद मोहन अवस्थी, प्रतीक एडविन शर्मा आदी मान्यवर उपस्थित होते.



संपादकीय

## स्वदेशी अभियानातून वस्त्रोद्योगाला उभारी

अमेरिकेने भारतावर निर्बंध घातल्याचा परिणाम जाणवू नये, म्हणून केंद्र सरकारने जसा अन्य देशांशी व्यापार वाढवण्याचा निर्णय घेतला आहे, त्याच प्रकारे देशांतर्गत बाजारात उठाव वाढावा म्हणून जीएसटी करांची फेररचना केली. त्याचबरोबर स्वदेशी अभियानाच्या माध्यमातून देशातील वस्तूंची खरेदी वाढावी यासाठी प्रयत्न करण्यात येत आहे. त्याचा वस्त्रोद्योगाला मोठा आधार मिळाला आहे. वस्त्रोद्योग क्षेत्रातील या भरारीचा वेध.केंद्र सरकारने देशभरात स्वदेशी मोहीम सुरू करण्याची घोषणा केली आहे. या मोहिमेचा उद्देश हातमाग, हस्तकला आणि घरगुती कापड उत्पादनांची मागणी वाढवणे हा आहे. विशेषतः शहरी तरुणांमध्ये आणि 'जनरेशन झेड'वर या अभियानाचा परिणाम झाला, तर भारतात देशांतर्गत उत्पादित कापडाची मागणी दरवर्षी नऊ-दहा टक्क्यांनी वाढेल आणि २०३० पर्यंत ती २५० अब्ज डॉलर्सपर्यंत पोहोचेल. वस्त्रोद्योग मंत्रालयाच्या मते, २०२४ मध्ये भारताची कापड आणि वस्त्रोद्योग बाजारपेठ १७९ अब्ज डॉलर्सपर्यंत पोहोचली होती. गेल्या वर्षी तिचा वार्षिक वाढीचा दर अंदाजे सात टक्के होता. देशातील उत्पादित कापडाचा देशांतर्गत बाजारपेठेतील वाटा ५८ टक्के आहे आणि तो अंदाजे ८.१९ टक्क्यांनी वाढत आहे. परदेशातून आयात केलेल्या कपड्याचा वापर २१ टक्के असून वार्षिक ६.७९ टक्क्यांनी वाढत आहे. घरगुती कापड उत्पादनांची मागणी वाढवण्यासाठी तरुणांना आणि शहरी वर्गाला सहभागी करून घेण्याचे महत्त्व या आकडेवारीवरून स्पष्ट होते. भारतीय कापडांना तरुणांमध्ये अभिमान आणि शैलीचे प्रतीक बनवणे, हा स्वदेशी मोहिमेमागील प्राथमिक उद्देश आहे. या उपक्रमामुळे केवळ तरुण ग्राहकांमध्ये स्वदेशी उत्पादनांची स्वीकृती वाढणार नाही, तर वीणकर, कारागीर आणि सूक्ष्म, लघू आणि मध्यम उद्योगांसाठी (एमएसएमई) उत्पन्न आणि बाजारपेठेच्या संधीदेखील वाढतील. या उपक्रमांतर्गत विविध मंत्रालये, सार्वजनिक क्षेत्रातील युनिट्स आणि शैक्षणिक संस्थांना त्यांच्या कर्मचारी आणि विद्यार्थ्यांसाठी गणवेश आणि सजावटीमध्ये भारतीय बनावटीचे कापड स्वीकारण्यास प्रोत्साहित केले जाईल.सरकारच्या ताज्या निवेदनानुसार स्वदेशी मोहीम उत्पादन-आधारित प्रोत्साहन योजना, 'पीएम मित्र पार्क' आणि 'एक जिल्हा, एक उत्पादन उपक्रम' यासह विद्यमान कार्यक्रमांना पूरक ठरेल. ही मोहीम 'सोशल मीडिया', राज्यस्तरीय भागीदारी आणि जनजागृती कार्यक्रमांद्वारे तरुणांपर्यंत पोहोचेल. याव्यतिरिक्त, जीएसटी दरांमध्ये अलीकडच्या काळात झालेल्या बदलांमुळे देशांतर्गत आणि बिगर-देशांतर्गत वापर वाढेल. यामुळे देशात कापड आणि कपड्यांची मागणी वाढू शकते. मंत्रालयाने या मोहिमेचे केंद्रबिंदू म्हणून विशेषतः शहरी तरुणांना आणि 'जनरेशन झेड' पिढीला लक्ष्य केले आहे. भारतीय कापड परिधान करणे केवळ पारंपरिकच नाही, तर स्टायलिश आणि फॅशनेबलदेखील असू शकते हे त्यांना दाखवणे हा यामागील उद्देश आहे. या उपक्रमामुळे तरुणांना स्थानिक कारागीर आणि विणकरांना पाठिंबा देण्यासाठी प्रेरणा मिळेल. स्वदेशी मोहिमेमुळे केवळ ग्राहकांना फायदा होणार नाही, तर लघू आणि मध्यम उद्योग तसेच हस्तकला उद्योगांना रोजगार आणि बाजारपेठेत प्रवेश वाढण्याची संधी मिळेल. वीणकर आणि कारागीरांना आपली उत्पादने थेट ग्राहकांना विकण्याची संधी मिळेल. त्यामुळे त्यांचे उत्पन्न वाढेल आणि स्थानिक अर्थव्यवस्था मजबूत होईल. अशा उपक्रमांमुळे केवळ कापड उद्योगाला चालना मिळणार नाही, तर स्वदेशी उत्पादनांची जागतिक मान्यता मजबूत होईल. एकंदरीत, स्वदेशी मोहीम ही एक महत्त्वपूर्ण पायरी आहे, जी २०३० पर्यंत देशांतर्गत कापडाची मागणी २५० अब्ज डॉलर्सपर्यंत वाढवण्यास मदत करेल.तरुणाई आणि 'जनरेशन झेड'चा सहभाग, सरकारी पाठिंबा, 'एमएसएमई'कडून मिळणारा पाठिंबा आणि 'सोशल मीडिया मोहिमा' या उपक्रमाला यशस्वी करण्यात महत्त्वाची भूमिका बजावतील. भारताचा कापड उद्योग आता फक्त कपडे बनवण्यापुरता मर्यादित नाही, तर तो नवोपक्रम आणि शाश्वततेकडे एक मोठा बदल म्हणून पाहत आहे. पर्यावरणपूरक कापड, डिजिटल तंत्रज्ञान आणि पुनर्वापर वाढत आहे. त्याचा पर्यावरण रक्षणालाही फायदा होत आहे. कापड उद्योग आता नवीन तंत्रज्ञान आणि 'ग्रीन थॉट'सह भविष्याकडे वाटचाल करत आहे. नवोपक्रम उद्योगाचा चेहरा-मोहरा बदलत आहे. कापड उद्योग जुन्या पद्धतींपेक्षा पुढे जात आहे आणि स्मार्ट कापड आणि शाश्वत उत्पादन तंत्रांचा अवलंब करत आहे. कंपन्या कृत्रिम बुद्धिमत्ता, थ्री डी प्रिंटिंग आणि 'बायोफॅब्रिकेशन'सारख्या तंत्रज्ञानाचा वापर करत असल्यामुळे कपडे चांगलेच नाहीत, तर पर्यावरणपूरकदेखील बनत आहेत. डिजिटल रंगकारी आणि पाणीरहित प्रक्रिया यासारख्या तंत्रज्ञानामुळे आता कापड उत्पादनात पाणी आणि रसायनांचा वापर कमी होत आहे. फॅशन उद्योगावर वाढत्या पर्यावरणीय दबावामुळे, ब्रँड आता शाश्वत कापडांवर भर देत आहेत. पुनर्वापर केलेले पॉलिस्टर, सेंद्रिय कापूस आणि बांबू किंवा जूटसारखे नैसर्गिक तंतू नवीन पर्याय बनत आहेत. शिवाय, अनेक कंपन्या सर्क्युलर फॅशन मॉडेल स्वीकारत आहेत. ते जुन्या कपड्यांचे नवीन कपड्यांमध्ये पुनर्वापर करतात. हा उपक्रम केवळ पर्यावरणाचे रक्षण करत नाही, तर ग्राहकांना खरेदी करण्यास प्रेरित करतो.भारत जगातील सर्वात मोठ्या कापड उत्पादकांपैकी एक असून शाश्वत कापडनिर्मिती आणि व्यवहाराकडे वेगाने वळत आहे. सरकार 'मेक इन इंडिया' आणि 'टेक्स्टाइल पार्क'सारख्या योजनांद्वारे हरित उत्पादनाला प्रोत्साहन देत आहे. निर्यात क्षेत्रातही शाश्वत कापडांची मागणी वाढत आहे. त्यामुळे भारताला मजबूत पाय रोवता येत आहेत. भविष्यात भारतीय कापड उद्योग आर्थिकदृष्ट्याच नव्हे, तर पर्यावरणदृष्ट्याही जागतिक स्तरावर आघाडीची भूमिका बजावण्यास सज्ज आहे. कापड उद्योगाचे भविष्य आता नवोपक्रम, शाश्वतता आणि तंत्रज्ञानाच्या नवीन अंतर्विरोधाशी जोडले आहे. हा बदल केवळ फॅशनची दिशा बदलत नाही, तर पृथ्वीचे भविष्यदेखील सुरक्षित करत आहे. 'ग्रीन फॅशन'चा ट्रेंड वाढला आहे. परिणामी, निसर्गावर आधारित कपड्यांची मागणी ४३ टक्क्यांनी वाढली आहे. भारतासह पाच देशांनी नैसर्गिक साहित्यापासून बनवलेले कपडे वेगाने स्वीकारले आहेत. आंतरराष्ट्रीय अहवाल आणि अभ्यासातून दिसून आले आहे, की लोक आता 'ब्रँडेड ग्लिट्झ'पासून दूर जात असून सभोवतालच्या साहित्यांसह फॅशनची व्याख्या नव्याने लिहीत आहेत. जुने कपडे, ज्यूट, बांबू, पाने, पुनर्वापर केलेले कापड आणि नैसर्गिक रंगाच्या वापरावर भर दिला जात आहे. हा ट्रेंड केवळ पर्यावरण संरक्षणाच्या दिशेने एक ठोस पाऊल नाही, तर रासायनिक कापड आणि मायक्रो प्लास्टिकने भरलेल्या कपड्यांना जागतिक प्रतिसाददेखील बनत आहे.संयुक्त राष्ट्र पर्यावरण कार्यक्रम (यूएनईपी) आणि 'ग्लोबल फॅशन अजेंडा' यांच्या 'द स्टेट ऑफ सर्क्युलर फॅशन' या संयुक्त अहवालानुसार स्वीडन, फ्रान्स, जपान, कॅनडा आणि भारत हे सर्वात वेगाने शाश्वत किंवा निसर्ग अनुकूल फॅशन स्वीकारणारे आघाडीचे पाच देश आहेत. 'फॅशन थिअरी : द जर्नल ऑफ ड्रेस, बॉडी अँड कल्चर'मध्ये प्रकाशित झालेल्या या अहवालात म्हटले आहे की, २०१४ ते २०२४ या कालावधीत या देशांमध्ये निसर्गावर आधारित कापडांची (हिरवे कपडे) मागणी सरासरी ४३ टक्क्यांनी वाढली आहे. सर्वात लक्षणीय बदल स्वीडनमध्ये दिसून आला. तेथील 'एलेन मॅकआर्थर फाऊंडेशन'च्या आकडेवारीनुसार, २०१५ ते २०२४ दरम्यान पुनर्नविनीकरण केलेल्या किंवा सेंद्रिय कपड्यांच्या विक्रीत ६१ टक्के वाढ झाली. 'इंटरनॅशनल जर्नल ऑफ सस्टेनेबल फॅशन अँड टेक्स्टाईल्स'मध्ये प्रकाशित झालेल्या दुसऱ्या अहवालानुसार, नैसर्गिक संसाधनांचे पुनर्नविनीकरण आणि कापडांचा पुनर्वापर यावर आधारित 'रिजनरेटिव्ह फॅशन' या मॉडेलने गेल्या पाच वर्षांमध्ये जागतिक शहरी फॅशन बाजारपेठेत लक्षणीय स्थान मिळवले आहे. स्टॉकहोम, पॅरिस, टोकियो, न्यूयॉर्क, सेऊल, मुंबई, सिडनी, बर्लिन, मस्टरडॅम, टोरंटो, सिंगापूर आणि मेलबर्न या बारा प्रमुख शहरांमध्ये केलेल्या सर्वेक्षणात आढळून आले की, अंदाजे ३८ टक्के ग्राहक आता फक्त पुनर्नविनीकरण केलेले किंवा नैसर्गिक स्रोतांपासून बनवलेले कपडे खरेदी करण्यास प्राधान्य देतात. जुन्या वस्तूंचा पुनर्वापर करणे हा एक फॅशन ट्रेंड बनला आहे. अहवालानुसार अलीकडच्या काळात 'अपसायकलिंग', जुन्या किंवा टाकून दिलेल्या वस्तूंचे पुनर्वापर करणे हा एक फॅशन ट्रेंड बनला आहे. पॅरिस, मिलान आणि टोकियो येथील फॅशन शोमध्ये, डिझायनर्स आता जुन्या जीन्स, उरलेल्या धाग्यापासून आणि कापडाच्या तुकड्यांपासून नवीन कपडे तयार करत आहेत. भारतात दिल्ली, जयपूर आणि मुंबईमधील तरुण डिझायनर्स नैसर्गिक रंग, खादी, हातमाग यांच्या माध्यमातून जुने कापड वापरून नवे कपडे तयार करत आहेत. या सर्वांचा परिणाम प्रतिकूल परिस्थितीतही भारतीय वस्त्रोद्योगाला सावरण्यास मदतकारक होत आहे.

# मयंक गांधींनी केलेले प्रयोग देशभरात नेणार

# ग्लोबल विकास ट्रस्टसोबत मिळून केंद्र सरकार काम करणार-कृषीमंत्री शिवराज सिंह चौहान

## केंद्र सरकारने संपूर्ण कर्जमाफी करून शेतकऱ्यांना धीर द्यावा; मयंक गांधींची केंद्रीय कृषिमंत्र्यांना विनंती

## अभूतपूर्व शेतकरी संवाद मेळावा ठरला परिवर्तनाची नांदी; शेतकऱ्यांचा उदंड प्रतिसाद

दैनिक वादळ वार्ता

**परळी वैजनाथ । प्रतिनिधी**

देशात साडेसहा लाख गावे आहेत... संकल्प केला तर सर्व गावांत परिवर्तन घडू शकते. मला इथे येऊन स्वागत किंवा जयजयकार करून घ्यायचा नव्हता. मला इथे ग्लोबल विकास ट्रस्टने केलेले आदर्शवादी काम पहायचे होते. शेतकऱ्यांच्या जीवनात खरोखरच आर्थिक क्रांती घडू शकते हा आत्मविश्वास इथे आल्यानंतर मला आणि सर्वकाही पाहिल्यानंतर वाटतो आहे. जलसंवर्धन, नदी पुनरुज्जीवन, फळबाग लागवड, तुतीची शेती यावर त्यांच्यासोबत बसून एक अभ्यासपूर्ण मॉडेल बनवून त्याला देशभर लागू करायचे असल्याचे प्रतिपादन केंद्रीय कृषीमंत्री शिवराज सिंह चौहान यांनी केले. ग्लोबल विकास ट्रस्टच्या वतीने आयोजित भव्य शेतकरी संवाद मेळाव्यात बोलतांना केले. यावेळी कार्यक्रमास जलनायक मयंक गांधी, युपीएलचे विक्रम श्रॉफ, रवी झुनझुनवाला, वसंतराव नाईक कृषी विद्यापीठाचे डॉ.इंद्रमणी त्रिपाठी, ग्लोबल विकास ट्रस्टचे संचालक डॉ.हरिश्चंद्र वंगे आदि मान्यवरांची उपस्थिती होती.

शेतकऱ्यांचे उत्पन्न एवढे वाढेल की देशातील एकही शेतकरी आत्महत्या करणार नाही. भारताचा कृषीमंत्री म्हणून मी आपल्या लढाईत सहभागी आहे. शेतकऱ्यांसाठी काम करणे हासुद्धा एक फार मोठा संघर्ष आहे. एक युद्ध गरिबीच्या विरोधात, एक युद्ध लाचारी आणि हतबलतेच्या विरोधात लढूया आणि येणाऱ्या भविष्यकाळात हातात हात घेऊन काम करूया. केंद्र आणि राज्य सरकार शेतकऱ्यांच्या पाठीशी आहे असा विश्वास केंद्रीय कृषीमंत्री शिवराज सिंह चौहान यांनी उपस्थित हजारो शेतकऱ्यांना दिला. तर ग्लोबल विकास ट्रस्टचे संस्थापक अध्यक्ष मयंक गांधी म्हणाले की, ब्रिटिशांच्या काळात फोडा आणि राज्य करा अशी निती होती. आज देशाला स्वातंत्र्य मिळून कित्येक वर्षे झाली तरीही आपण विभागलेलेच आहोत. पक्षात, प्रदेशात, जातीत अशा आपल्या विभागण्या झाल्या आहेत. आज आपल्याला शेतकरी म्हणून एकत्र यायला पाहिजे. ऑगस्ट आणि सप्टेंबर महिन्यात अतिवृष्टी झाली त्यात शेतकऱ्यांची पिके तर वाहून गेलीच मात्र मातीही वाहून गेल्याने त्यांची स्वप्नेही वाहून गेली. अगोदरच शेतकरी अस्मानी संकटांच्या गर्तेत असताना त्यात सुलतानी संकटेही त्याला सोडत नाहीत. शेतकऱ्यांना हमीभाव मिळत नसल्याने कापूस आणि सोयाबीन उत्पादक शेतकरी संकटात आहे. एक रुपयाही उत्पन्न मिळत नसतांना तो जगतो कसा? हाच प्रश्न मला पडलेला असल्याचे त्यांनी म्हटले. सिरसाळा येथे ग्लोबल विकास ट्रस्टच्या वतीने भव्य शेतकरी मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. मराठवाड्याच्या विविध भागांतून हजारो शेतकऱ्यांनी उत्स्फूर्तपणे कार्यक्रमास उपस्थिती लावली. शेती संलग्न आस्थापनांचे विविध स्टॉल्सही कार्यक्रमस्थळी उभारण्यात आले होते. विविध गावांतील यशस्वी शेतकऱ्यांचा सन्मानही मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला.




**कृषीकुल एक फुल..!**

शेतकऱ्यांचे जीवन हे अतिशय कष्टप्रद आणि संघर्षाचे जीवन आहे. आम्ही शासन म्हणून तर त्यांच्या पाठीशी उभे राहूच मात्र परिवर्तन घडवण्यासाठी सर्वांचाच सहभाग महत्वाचा असतो. सामाजिक संस्था म्हणून ग्लोबल विकास ट्रस्ट जे काम करत आहे ते वाखाणण्याजोगे आहे. पाणी नसलेल्या ओसाड मालावर फुल उमलावे तसेच काम ही संस्था महाराष्ट्राच्या आणि मराठवाड्याच्या भूमीत करत आहे. म्हणून कृषीकुल एक फुल असा उल्लेख केंद्रीय कृषीमंत्री शिवराज सिंह चौहान यांनी केला.

**शिवराज सिंह चौहान**

शेती हा भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा असून शेतकरी हा त्याचा आत्मा आहे. कृषीमंत्री म्हणून शेतकऱ्यांची सेवा करणे म्हणजे ईश्वरसेवा करणे आहे असे मी समजतो. लोकशाहीतील सर्व व्यवस्था आणि पदे ही लोकसेवेसाठी असतात. जनसेवा हीच ईश्वरसेवा याच भावनेने प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात आम्ही लोकांचे जीवन बदलण्याचे प्रयत्न करत आहोत. काही कामे शासन करते तर काही कामे लोकांना करावी लागतात. शेतकऱ्यांचे एकरी उत्पन्न वाढले पाहिजे, पहिल्यांदा आम्ही जे शास्त्रज्ञ प्रयोगशाळेत बसून काम करत होते त्यांना बांधावर जाऊन संशोधन करायला सांगितले. याचा अत्यंत प्रभावी परिणाम दिसून आला आणि काही महत्त्वपूर्ण निष्कर्ष समोर आले. यावर्षी अतिवृष्टी झाली आणि पिके वाहून गेली. पिके वाहून गेली म्हणजे तेवढेच नुकसान होत नाही तर त्या शेतकऱ्यांच्या कुटुंबाची स्वप्ने वाहून जातात.

मी आपल्याला विश्वास देतो की केंद्र सरकार आणि राज्य सरकार मिळून आपल्याला मदत करणार आहोत. राज्य सरकार त्यांचा हिस्सा खर्च करेल तर केंद्र सरकार आपत्ती निवारण विभागाचा वेगळा निधी शेतकऱ्यांना मदत म्हणून त्यांच्या खात्यात वर्ग करेल. शेतकऱ्यांना मदत करतांना आम्ही कुठेही कमी पडणार नाही. एवढेच नाही तर पीकविमा विभाग माझ्या मंत्रालयाच्या अंतर्गत येत असल्याने शेतकऱ्यांना योग्य मोबदला पिकविण्याच्या माध्यमातून मिळावा यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत. झालेल्या नुकसानीचा एक एक रुपया आम्ही शेतकऱ्यांना देऊ. कोरडा आणि ओल्या दुष्काळाचा सक्षमपणे सामना करण्यासाठी प्रभावी यंत्रणा उभी करण्याचा आमचा संकल्प आहे. बियाणे खरेदीचे अनुदान शेतकऱ्यांच्या थेट खात्यावर वर्ग करण्याचा विचार आम्ही करत आहोत. मात्र यासाठी त्यांच्याकडून सूचना मागवत आहोत. त्याद्वारे प्रभावी योजना भविष्यात बनवली जाईल. शेतीची उत्पादन क्षमता घटत असल्याने गो आधारित शेती तसेच पर्यावरण पूरक शेती करण्यासाठी काय करता येईल याचा विचार आम्ही करत आहोत. सेंद्रिय शेतीचे ग्लोबल विकास ट्रस्टने केलेले प्रयोग आम्ही देशभर मॉडेल म्हणून घेऊन जाणार आहोत. पारंपरिक शेतीतून शाश्वत शेतीकडे शेतकऱ्यांना घेऊन जाण्याचे काम मयंक गांधींच्या नेतृत्वाखाली ग्लोबल विकास ट्रस्टने केले आहे याबद्दल त्यांचे खूप खूप अभिनंदन. शेतीची पद्धत बदलली तर शेतकऱ्यांचे जीवन बदलेल. म्हणूनच केंद्र सरकार यापुढे ग्लोबल विकास ट्रस्ट सोबत काम करणार आहे.

**जलनायक मयंक गांधी**

तुमच्यामध्ये राहून मला आता सात वर्षे झाले.... माझे वडील गुजरात वरून आले होते. माझ्या अनेक पिढ्या मुंबईमध्ये गेल्या. मी इथे राहिलो तेंव्हा मी.कधी तुमचा होऊन गेलो मलाच कळले नाही. या देशात परळीसारखे माणुसकी असलेली माणसे पहिली नाहीत. ब्रिटिशांच्या काळात फोडा आणि राज्य करा अशी निती होती. आज देशाला स्वातंत्र्य मिळून कित्येक वर्षे झाली तरीही आपण विभागलेलेच आहोत. पक्षात, प्रदेशात, जातीत अशा आपल्या विभागण्या झाल्या आहेत. आज आपल्याला शेतकरी म्हणून एकत्र यायला पाहिजे. ऑगस्ट आणि सप्टेंबर महिन्यात अतिवृष्टी झाली त्यात शेतकऱ्यांची पिके तर वाहून गेलीच मात्र मातीही वाहून गेल्याने त्यांची स्वप्नेही वाहून गेली. अगोदरच शेतकरी अस्मानी संकटांच्या गर्तेत असताना त्यात सुलतानी संकटेही त्याला सोडत नाहीत. शेतकऱ्यांना हमीभाव मिळत नसल्याने कापूस आणि सोयाबीन उत्पादक शेतकरी संकटात आहे. एक रुपयाही उत्पन्न मिळत नसतांना तो जगतो कसा? हाच प्रश्न मला पडलेला आहे.राज्यातील शेतकऱ्यांच्या अनेक समस्या आहेत. संकटातील शेतकऱ्यांना राज्य सरकारला बोलून मदत करायला हवी. यंदाच्या झालेल्या अतिवृष्टीने शेतकरी पूर्णतः खचला असल्याने शेतकऱ्यांची कर्जमाफी करायला हवी अशी माझी विनंती आहे. आम्ही शेतकऱ्यांना फळबाग लागवड करण्यासाठी प्रोत्साहित करत आहोत. लागवड करायला पैसे नसतील तर शेतकऱ्यांना ए. यू.बँकेच्या मार्फत अर्थसहाय्य आम्ही करणार आहोत. त्याचसोबत कृषीकुल शेतकरी प्रशिक्षण केंद्रातून मोफत प्रशिक्षणसुद्धा देणार आहोत.

**विक्रम श्रॉफ**

आजचा दिवस हा आपला दिवस आहे... सिरसाळा येथे येऊन मी खूपच खुश आहे. संकटातही शेतकऱ्यांमधील उत्साह वाखाणण्याजोगा आहे.

**रवी झुनझुनवाला**

शिवराज सिंह चौहान हे मंत्री बिलकूल आहेत परंतु ते अगोदर शेतकरी आहेत. शेतीविषयी प्रचंड आत्मियता असलेले व्यक्तिमत्व आपल्या देशाला कृषीमंत्री म्हणून लाभले आहेत. ग्लोबल विकास ट्रस्टने केलेले काम त्यांना पहायचे होते. शेतकऱ्यांच्या विकासाचे हे मॉडेल त्यांना संपूर्ण देशात पोचवायचे आहे म्हणून ते इथे आले, त्यांनी ग्लोबल विकास ट्रस्टच्या टीम सोबत चर्चा केली आणि कामाचे स्वरूप जाणून घेतले.

**इंद्रमणी त्रिपाठी**

महाराष्ट्राची शेती ही अतिशय वेगळ्या स्वरूपाची आहे. कृषी क्षेत्रातील नाविन्यपूर्ण बदल होऊ घातले आहेत. शेतकऱ्यांमध्ये बदलाची भावना रुजवण्याचे महत्त्वपूर्ण कार्य मयंक गांधी व ग्लोबल विकास ट्रस्टच्या माध्यमातून होत आहे. आधुनिक शेतीसाठी आता कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्राचा वापर केला जातोय हे अतिशय विशेष आहे.

**डॉ.हरिश्चंद्र वंगे**

जलनायक मयंक गांधी यांनी परळीत पाऊल ठेवले. इथल्या लोकांच्या हाल अपेष्टा पहिल्या, समजून घेतल्या. हे पाहिल्यानंतर त्यांच्या मनाला अतिशय वेदना झाल्या आणि त्यांनी संकल्प केला की, मी या लोकांचे जीवन बदलल्या शिवाय इथून जाणार नाही. त्यांनी मुंबईचे स्वतःचे घर विकले आणि त्यातून त्यांनी इथे समाजसेवेला सुरुवात केली. मैं चलता गया कारवां बनता गया... या हिंदीतील उक्तीप्रमाणे एकेकजण सोबत येत गेला आणि त्यातूनच ग्लोबल विकास ट्रस्ट परिवार वाढत गेला.

# महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर यांच्या राजीनाम्याची वंचितची मागणी: मंत्रालयासमोर निषेध मोर्चा पोलिसांचा लाठीचार्ज, महिला कार्यकर्त्या जखमी

दैनिक वादळ वार्ता

**मुंबई । प्रतिनिधी**

डॉ. संपदा मुंडे आत्महत्या प्रकरणातील असंवेदनशील आणि स्त्रिविरोधी वक्तव्यामुळे महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर यांच्या राजीनाम्याची मागणी जोर धरत आहे. वंचित बहुजन महिला आघाडी मुंबईने यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) कार्यालयासमोर मंत्रालयाजवळ निषेध मोर्चा काढला. मात्र, राज्य सरकारने हा मोर्चा दाबण्यासाठी पोलिसांकडून लाठीचार्ज करून कार्यकर्त्यांना मारहाण केली आणि ताब्यात घेतले. या अमानुष कारवाईमुळे अनेक कार्यकर्त्यांच्या कपड्यांचे फाटले, तर मुंबई प्रदेश महिला अध्यक्ष स्नेहल सोहनी यांच्या हाताला दुखापत झाली. वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष ड. प्रकाश आंबेडकर यांनी या घटनेचा तीव्र निषेध केला आहे.

**प्रकरणाची पार्श्वभूमी: असंवेदनशील वक्तव्य आणि वंचितची मागणी**

डॉ. संपदा मुंडे यांच्या आत्महत्येच्या प्रकरणात महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर यांनी महिलांबाबत असंवेदनशील आणि स्त्रिविरोधी वक्तव्य केल्याचा आरोप वंचित बहुजन महिला आघाडीने केला आहे. या वक्तव्यामुळे महिलांच्या सुरक्षिततेच्या मुद्द्यावर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले असून, चाकणकर यांच्या पदावर प्रश्न उपस्थित केले जात आहेत. वंचित बहुजन महिला आघाडीने राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गटाचे) प्रदेशाध्यक्ष सुनील



तटकरे यांच्याकडे मागणी केली होती की, महिलांबाबत सातत्याने असंवेदनशील पद्धतीने वक्तव्य करणाऱ्या चाकणकर यांना तात्काळ पदावरून हटवावे. मात्र, या मागणीला प्रत्युत्तर म्हणून सरकारने पोलिसबळाचा वापर करून मोर्चा दाबण्याचा प्रयत्न केला.

**निषेध मोर्चा आणि पोलिस कारवाई: जखमीरित्या आणि अमानुष वागणूक**

मुंबईतील वंचित बहुजन महिला आघाडीच्या नेतृत्वाखालील कार्यकर्त्यांनी मंगळवारी मंत्रालयासमोर निषेध मोर्चा काढला. यावेळी पोलिसांनी लाठीचार्ज करून मोर्चा रोखला आणि कार्यकर्त्यांना ताब्यात घेतले. धक्काबुक्की दरम्यान अनेकांच्या कपड्यांचे फाटले, तर महिलांना अमानुषपणे वागणूक देण्यात आली. जखमी झालेल्यांमध्ये मुंबई प्रदेश महिला अध्यक्ष स्नेहल सोहनी (हाताला दुखापत), राज्य प्रवक्ता आणि राज्य महिला आयोग माजी सदस्या उत्कर्षाताई रूपवते, तसेच इतर पदाधिकारी आणि कार्यकर्त्या यांचा समावेश आहे. सोहनी यांनी सांगितले, महिलांच्या हक्कांसाठी लढत असताना पोलिसांकडूनच हिंसा होणे हे लज्जास्पद आहे. चाकणकर यांच्या वक्तव्याला विरोध करत असताना आम्हाला धडक मारली गेली.

या कारवाईमुळे वंचित बहुजन आघाडीतील नेत्यांमध्ये रोष निर्माण झाला असून, मोर्च्यात सहभागी झालेल्या महिलांनी पोलिसांच्या या वर्तनाचा तीव्र निषेध केला. कार्यकर्त्यांनी म्हटले, महिला आयोगाच्या अध्यक्षा महिलांविरोधी बोलतात आणि सरकार पोलिसांद्वारे महिलांवरच हल्ला करते. ही दुर्दैवी स्थिती आहे.

**प्रकाश आंबेडकरांचा तीव्र निषेध: सरकारवर टीका**

वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष आणि प्रसिद्ध विधिज्ञ ड. प्रकाश आंबेडकर यांनी या पोलिस कारवाईचा तीव्र निषेध केला आहे. त्यांनी जारी केलेल्या निवेदनात म्हटले, महिलांच्या असंवेदनशील वक्तव्यावर प्रश्न उपस्थित करणाऱ्या शांततापूर्ण मोर्चावर पोलिस बळाचा वापर करणे हे लोकशाहीविरोधी आणि स्त्रिविरोधी आहे. रुपाली चाकणकर यांच्या राजीनाम्याची मागणी योग्य आहे आणि सरकारने ती मान्य करावी. जखमी कार्यकर्त्यांवर कारवाई करणाऱ्या अधिकाऱ्यांवर गुन्हे दाखल करावेत. आंबेडकर यांनी या प्रकरणात तात्काळ चौकशीची मागणीही केली आहे.राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) आणि महायुती सरकारवरून या प्रकरणात राजकीय टीका होत आहे. विरोधकांनी म्हटले की, महिला आयोगाच्या अध्यक्षा असलेल्या व्यक्तीने महिलांच्या भावनांचा आदर न केल्यास तिचे पद काय अर्थपूर्ण राहते? वंचित बहुजन आघाडीने जखमी कार्यकर्त्यांसाठी न्याय मागण्यासाठी आंदोलनाचा इशारा दिला असून, येत्या काळात मोठ्या प्रमाणावर निषेध मोर्चे काढण्याची शक्यता आहे. सुनील तटकरे यांच्याकडून अद्याप कोणतीही प्रतिक्रिया आलेली नाही.या घटनेमुळे महाराष्ट्रातील महिलांच्या सुरक्षितता आणि राजकीय जबाबदारीच्या मुद्द्यावर नवीन चर्चा सुरू झाली असून , प्रकरणाचा निकाल काय होणार याकडे लक्ष लागले आहे.

## स्वामी विवेकानंद विद्या मंदिर शाळेमध्ये भारत मातेच्या स्तुतीचा गौरव दिन

# 'वंदे मातरम' गीताचे सामूहिक गायन, जगण्याची मूल्य खऱ्या अर्थाने भारतात आहेत-शशिकांत गव्हाणे

## आद्यमहत्व देशाला व नंतर स्वकर्माला द्यावे-ह.भ.प.केशव महाराज शास्त्री

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

जीवन विकास शिक्षण मंडळ केज संचलित, स्वामी विवेकानंद विद्या मंदिर माध्यमिक विभाग या शाळेच्या प्रांगणामध्ये श्रीमंत सरदार महादजी शिंदे शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था केजच्या संयुक्त विद्यमाने दि.७ नोव्हेंबर २०२५ वार शुक्रवार रोजी भारतमातेच्या स्तुतीचा गौरव दिन 'वंदे मातरम' या गीताच्या १५० वर्षपूर्ती निमित्त सामूहिक गायनाचा कार्यक्रम संपन्न झाला. याप्रसंगी कार्यक्रमाचे प्रमुख अध्यक्ष म्हणून ह.भ.प.केशव महाराज सारूक शास्त्री,भगवान श्रीकृष्ण आश्रम केज हे उपस्थित होते.तर प्रमुख पाहुणे म्हणून शशिकांत गव्हाणे,भारतीय किसान संघ मराठवाडासमन्वयक यांनी उपस्थिती दर्शवली. इतर उपस्थित मान्यवरां मध्ये सुनील केंद्रे,गट शिक्षणाधिकारी केज, व्ही.एम नागरगोजे,गट विकास अधिकारी पंचायत समिती केज, जी.बी.गदळे,सचिव, जीवन विकास शिक्षण मंडळ केज,ए.पी.आय. मांजरमे साहेब, बाळासाहेब अहंकारे साहेब,पोलीस स्टेशन केज,ह.भ.प.विष्णु महाराज शास्त्री,हनुमंत घाडगे,शैलाताई इंगळे, अध्यक्षा शालेय व्यवस्थापन समिती, शाळेच्या मुख्याध्यापिका शिवनंदा मुळे,गणेश कोकीळ मु.अ.स्वामी विवेकानंद इंग्लिश स्कूल. प्राचार्य शंकर भैरट,ज्येष्ठ पत्रकार गौतम बचुटे, एकनाथ गोरे,धनराज पुरी,मुसळे सर,रोडेवाड सर,मुंडे सर,विनोद गुंड तसेच शाळेतील सर्व शिक्षकवृंद आदी उपस्थित होते.कार्यक्रमाच्या प्रारंभी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते भारतमातेच्या प्रतिमेचे पूजन तसेच दीप प्रज्वलन करण्यात आले. याप्रसंगी उपस्थित मान्यवर तसेच स्वामी विवेकानंद विद्यामंदिर, रामराव पाटील विद्यालय, सरस्वती कन्या प्रशाला, स्व.प्रमोद महाजन कनिष्ठ महाविद्यालय केज या शाळेतील विद्यार्थी व शिक्षकवृंद यांनी 'वंदे मातरम' या गीताचे सामूहिक गायन केले. याप्रसंगी उपस्थित मान्यवरांचे स्वागत शाळेतील सांस्कृतिक विभागप्रमुख प्रबोधकांत समुद्रे यांनीशब्द सुमने अंतकरणे अतिथींना वंदूनी करितो स्वागत मंगलदिनी या गीताने केले.कार्यक्रमाचे प्रस्ताविक आय.टी.आय. केज येथील शिक्षक शिंदे सर यांनी केले.पुढे स्वामी विवेकानंद विद्यामंदिर शाळेतील विद्यार्थ्यांनी वंदे मातरम लघु नाटिका सादर केली.यामध्ये सूर्यवंशी आदित्य,जाधव संस्कृती,चाटे आरती, शिंदे अमृता,क्षीरसागर सिद्धी हेविद्यार्थी



सहभागी होते. या नाटिकेने सर्वांची मने जिंकली. कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते शशिकांत गव्हाणे यांनी याप्रसंगी बोलताना म्हणाले की,भारतातील स्वातंत्र्यसैनिक,संत यांचे कर्तृत्व,नेतृत्व आणि जगणं हेच भारतीयांना दिशादर्शन करणार आहे, भारतमातेचे सुपुत्र संत एकनाथ महाराज म्हणतात की,'भरतखंडी नवदेहप्राप्ती ही तव परम भाग्याची संपत्ती' या उक्ती प्रमाणे भारतभूमीत जन्म घेण्यासाठी भाग्यच असावे लागते.त्याग, समर्पण,चारित्र्य, परोपकार,कृतज्ञता, सत्शील अशी कित्येक मूल्ये हा भारत शिकवतो. बंकिमचंद्र चटोपाध्याय यांचं 'वंदे मातरम्' हे गीत भारताच्या स्वत्वाचंच समर्ग दर्शन आहे.'अपि सवर्णमयि लंका लक्ष्मण में रोचते । जननी जन्मभूमिश्च स्वर्गादपि गरीयासे।।' या ओळीतून रामही सांगतात की, जन्मभूमी हीच स्वर्गाहून श्रेष्ठ असते.'वंदे मातरम्' हा मंत्र जणू जगण्या मरण्याची प्रेरणा देणारा आहे.म्हणून भारतमाता आपल्या जगण्यात उतरली पाहिजे.जातीवाद भाषावाद,प्रांतवाद मतभेद असे सर्व भेदाभेद बाजूला ठेवन भारतमाते प्रती समर्पण भावना जागृत व्हायला मदत करणारा मंत्र म्हणजे 'वंदे मातरम्' १९०५ ची बंगालची फाळणी थांबवणाराही हाच मंत्र आहे.अगाध देशभक्ती,स्वातंत्र्याची आस आणि वंदे मातरम हा मंत्र भारताला अखंड स्वातंत्र्य मिळवून देणारे आहेत.रामप्रसाद, बिसमिल्लाह,चंद्रशेखर आझाद,भगतसिंग, राजगुरू,सुखदेव अशा अनेक स्वातंत्र्यसैनिकांना देशाप्रती जाणीव देणारा 'वंदे मातरम' हाच मंत्र आहे. ज्या कादंबरीत चटोपाध्याय यांनी 'वंदे मातरम हे गीत लिहिले ती 'आनंदमठ' कादंबरी प्रत्येकाने वाचावी असा संदेश याप्रसंगी त्यांनी विद्यार्थ्यांना दिला. अध्यक्षीय समारोपात ह.भ.प.केशव महाराज शास्त्री म्हणाले की,भारत शब्दातील 'भा' म्हणजे ज्ञान आणि 'रत' म्हणजे रमणारे अर्थातच ज्ञानाच्या प्रकाशात रमणारे म्हणजे भारतीय आहेत.प्रत्येकाने समोरच्याप्रती आदरभाव ठेवावा.भगवंताप्रमाणेच समोरच्या व्यक्तीला योग्य वागणूक द्यावी.आद्य महत्त्व अगोदर देशाला व नंतर स्वकर्माला द्यावे. आपणा सर्वांना देशासाठी च जगायचं आहे आणि देशासाठीच मरायचं आहे' असा विश्वास त्यांनी बालमनी रुजवला.विचार बदलला तर जीवन बदलायला वेळ लागत नाही.शेवटी ते म्हणाले की,भारत हा कर्मप्रधान देश आहे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रबोधकांत समुद्रे यांनी केले तर आभार शिंदे सर यांनी मानले.

---

# दिवा प्रभाग समितीतील मालमत्ता कर विभागातील लूट तात्काळ थांबवा-ॲड रविराज बोटले

दैनिक वादळ वार्ता
**ठाणे । प्रतिनिधी**

दिवा प्रभाग समितीतील शास्ती (Penalty) च्या नावाखाली नागरिकांची मोठ्या प्रमाणावर होत असलेली आर्थिक लूट व भ्रष्टाचाराबाबत तात्काळ चौकशी करून सबधित अधिकाऱ्यावर कारवाई करून होणारा आर्थिक भ्रष्टाचार थांबवा यासाठी ॲड रविराज बोटले आक्रमक होत दिवा प्रभाग समितीमधील मालमत्ता कर विभागात सुरु असलेल्या गंभीर अनियमितता व भ्रष्टाचाराकडे लक्ष वेधले. सध्या परिस्थितीत प्रभागातील मालमत्ता कर व हस्तांतरण (Mutation) प्रकरणांमध्ये, सरकारकडून अंतिम आदेश/परिपत्रक स्पष्ट नसल्याचा फायदा उचलत काही कर्मचारी नागरिकांवर शास्ती (Penalty) लावण्याचे नावाखाली मोठ्या प्रमाणावर पैसे उकळत आहे तसेच असे दिसून येत आहे की-जे नागरिक बेकायदेशीर भ्रष्ट मार्गाने मागील दरवाजातून पैसे देतात, त्यांच्या फाइल्स त्वरित हस्तांतरित केल्या



जात आहेत.व जे सामान्य नागरिक अतिरिक्त पैसे देण्यास नकार देतात, त्यांच्या फाइल्स शास्ती भरली नाही अशा कारणांवर निकाली काढल्या जात आहेत त्यामुळे, नागरिकांचा प्रचंड छळ, मानसिक त्रास व आर्थिक शोषण चालू आहे.ही बाब संपूर्ण प्रभागातील सार्वजनिक हिताची असून त्वरित तपास व लेखा परीक्षण होणे अत्यंत आवश्यक आहे. दिवा प्रभाग समितीतील मालमत्ता कर विभागातील मागील सहा महिन्यांतील सर्व मालमत्ता हस्तांतरण (Mutation Entries) ची सखोल चौकशी व ऑडिट करण्यात यावे तसेच भ्रष्टाचारात सामील असलेल्या संबंधित कर्मचाऱ्यांची ओळख करून त्यांच्या विरुद्ध कडक शिस्तभंग कारवाई व फौजदारी प्रक्रिया राबविण्यात यावी,पुढील काळात मालमत्ता हस्तांतरण प्रक्रिया पूर्णपणे पारदर्शक, ऑनलाईन व नागरिकाभिमुख पद्धतीने करण्यात यावी,वरील बाबींची तात्काळ दखल घेऊन आवश्यक कार्यवाही करण्यात यावी असे यावेळी ॲड बोटले यांनी बोलताना स्पष्ट केले आहे.

---

# वंदे मातरम' गीताच्या १५० व्या वर्षानिमित्त नविन पनवेलमध्ये भव्य समूहगायन कार्यक्रम

दैनिक वादळ वार्ता
**पनवेल । प्रतिनिधी**

स्वातंत्र्य लढ्यातील सेनानी व शहिदांना वंदन आणि राष्ट्रीय एकात्मतेचे प्रतीक असलेल्या 'वंदे मातरम' या राष्ट्रगीताच्या १५० व्या वर्षानिमित्त भारतीय जनता पक्षातर्फे देशभरात विशेष उपक्रमांचे आयोजन करण्यात येणार येत असून त्या अनुषंगाने शुक्रवार दिनांक ०७ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ०४ वाजता नविन पनवेल मधील के. ए. बांठिया विद्यालय येथे 'वंदे मातरम' समूह गायन या विशेष कार्यक्रमाचे आयोजन राज्याचे वनमंत्री गणेश नाईक यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आल्याची माहिती कार्यक्रम प्रमुख आमदार प्रशांत ठाकूर यांनी आज येथे आयोजित करण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत दिली. तसेच या कार्यक्रमाच्या अनुषंगाने अभिनेते व राष्ट्रविचाराचे प्रसिद्ध व्याख्याते शरद पोंक्षे हे प्रमुख वक्ते म्हणून उपस्थितीत राहून वंदे मातरम गीताची पार्श्वभूमी व महत्व यावर मार्गदर्शन करणार असल्याचेही त्यांनी सांगितले. मार्केट यार्ड येथे झालेल्या या पत्रकार परिषदेला त्यांच्या समवेत भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत, जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, ॲड. प्रकाश बिनेदार, अनुसूचित जाती मोर्चाचे जिल्हाध्यक्ष अमित जाधव, भाजपचे पनवेल शहर मंडल अध्यक्ष सुमित झुंझारराव, नविन पनवेल मंडल अध्यक्ष दशरथ म्हात्रे, पूर्व मंडल अध्यक्ष भूपेंद्र पाटील, युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष आनंद ढवळे, यतीन पाटील आदी उपस्थित होते.

आमदार प्रशांत ठाकूर यांनी या कार्यक्रमाच्या संदर्भात माहिती देताना पुढे सांगितले कि, भारताच्या केंद्रीय मंत्रिमंडळाने वंदे मातरम गीताच्या १५० वर्षांच्या उल्लेखनीय परंपरेचा उत्सव राष्ट्रीयस्तरावर साजरा करण्याचा निर्णय घेतला आहे. त्याचप्रमाणे भारतीय जनता पार्टीच्या वतीने पंतप्रधान नरेंद्र मोदी, राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा, राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली भाजपा कार्यकर्ते आणि लोकसहभागातून हा उत्सव व्यापक




प्रमाणात साजरा होणार आहे. त्या अनुषंगाने भाजपा देशभरात विविध सांस्कृतिक कार्यक्रम, सामूहिक वंदे मातरम गायन, देशभक्तीपर रॅली तसेच जनजागृती उपक्रमांचे आयोजन करणार आहे. हे सर्व कार्यक्रम आगामी संविधान दिन (२६ नोव्हेंबर) पर्यंत सतत चालणार आहेत. देशभरात १५० ठिकाणी कार्यक्रम तर महाराष्ट्रात नागपूर, अकोला, ठाणे, रायगड, पुणे, अहिल्यानगर, कराड सातारा, जळगाव, धुळे, छत्रपती संभाजीनगर या १० ठिकाणी होणार असून रायगड जिल्ह्याचा कार्यक्रम ०७ नोव्हेंबरला नविन पनवेल येथे होणार आहे.

'वंदे मातरम' हे गीत भारतीय स्वातंत्र्य संग्रामातील राष्ट्रप्रेम, ऐक्य आणि स्वाभिमानाचे प्रतीक आहे. ब्रिटिश सत्तेविरुद्धच्या लढ्यात या गीताने असंख्य स्वातंत्र्यसैनिकांना प्रेरणा दिली. हे गीत केवळ शब्दांची अभिव्यक्ती नसून, भारतीय जनतेच्या भावविश्वाचे, स्वातंत्र्याच्या उत्कटतेचे आणि मातृभूमीवरील प्रेमाचे प्रतीक आहे. वंदे मातरमच्या इतिहासाची आणि राष्ट्रवादाच्या प्रेरणेची जनसामान्यांना माहिती करुन देणे, युवकांमध्ये देशभक्तीची भावना दृढ करणे, भारतीय संविधानाच्या मूल्यांचा प्रचार व प्रसार आणि त्या अनुषंगाने राष्ट्रीय एकात्मता आणि सामाजिक ऐक्याला बळकटी देणे हे या कार्यक्रमांचे प्रमुख उद्देश आहे. त्यानुसार बांठिया विद्यालय येथे होणाऱ्या या कार्यक्रमात विविध विद्यालयांचे अडीच हजारांहून अधिक विद्यार्थी, विविध संस्था, संघटना, पदाधिकारी व कार्यकर्ते सहभागी होणार असून नागरिकांनीही या महत्वपूर्ण उत्सवात सहभाग घ्यावा, असे आवाहन आमदार प्रशांत ठाकूर यांनी या पत्रकार परिषदेच्या माध्यमातून केले.

---

# शेलार आले; लातूर भाजपमधील गटबाजी आणि हुकूमशाही गडद करून गेले!

## ग्रामीण जिल्हाध्यक्षासह दोन आमदारांना बैठकीत स्थान नाही

## पाशा पटेल यांच्याकडे जायला लागू नये म्हणून शेलारांनी चक्क मार्गच बदलला

दैनिक वादळ वार्ता
**नदीम पटेल । लातूर**

राज्याचे सांस्कृतिक कार्य मंत्री आशिष शेलार हे लातूर दौऱ्याला नेमके कशासाठी आले होते हाच प्रश्न आता पडलाय.म्हणजे एक तर लातूरला येताना पत्रकार परिषद घेऊन आयते कोलीत विरोधकांना तर दिलेच, शिवाय घटनात्मक पदावर असलेल्या शेलारांनी एक प्रकारे सरकारची अडचणच केली.आणि लातूरला शेलार यांच्या दौऱ्याचे फलित काय असा प्रश्न जर उपस्थित केला तर शेलार लातूरला आले आणि लातूर भाजपामधील गटबाजी आणि नेतृत्वामधील हुकूमशाही गडद करून गेले असे नक्कीच म्हणता येईल.आणि सदरील आशिष शेलार यांचा दौरा हायजॅक केल्याप्रमाणे झाला.शेलार यांच्या उपस्थितीत लातूर शहर आणि लातूर ग्रामीणचा मेळावा झाला,ज्याला लातूर ग्रामीणचे अध्यक्ष बसवराज पाटील मुरूमकर यांना निमंत्रण दिले गेले नाही.सोबतच जिल्ह्यातील दोन आमदार ज्यात अभिमन्यु पवार आणि रमेश कराड यांना देखील निमंत्रण दिले गेले नाही.आणि सर्वात कहर म्हणजे आशीष शेलार हे नियोजित बाभळगाव मार्गे निलंग्याला जाणार होते.याच रस्त्यावर राज्याचे कृषी मूल्य आयोगाचे अध्यक्ष पाशा पटेल यांच्या लोदगा येथील कार्यालयात आशिष शेलार भेट देणार होते.मात्र लोदगा येथे पाशा पटेल यांच्याकडे जायला लागू नये म्हणून आशिष शेलार यांनी चक्क मार्ग बदलत बाभळगाव ऐवजी औसा मार्गे खराब रस्त्याने निलंग्याला गेले.कांही दिवसांपूर्वी लातूर ग्रामीणचे अध्यक्ष बसवराज पाटील मुरूमकर यांनी त्यांच्या कार्यालयात शहर जिल्हाध्यक्ष अजित पाटील कव्हेकर यांना झापत तुम्ही तुमचे स्वतंत्र कार्यक्रम घ्या,आमच्याकडे येण्याची गरज नाही असे सुनावले होते,ते अजित पाटील यांनी मनावर घेत बसवराज पाटील यांना लातूर ग्रामीणची बैठक असताना बोलवले नाही असा अर्थ काढला तर मुळीच चूक होऊ नये.सोबतच रमेश कराड यांच्या कार्यक्रमात पाशा पटेल यांनी अजित पाटील कव्हेकर यांना पिल्लू म्हणून संबोधले होते.त्याचा वचपा काढत शेलार यांच्या गाडीत कायम असलेले अजित पाटील कव्हेकर यांनी पाशा पटेल यांच्याकडे शेलार जाऊ नये म्हणून मार्गच बदलला की काय अशी परिस्थिती असल्याने असे जर असेल तर लातुरात भाजपचे भविष्य काय असेल हे वेगळे सांगायला नको.आणि कशी हुकूमशाही आणि हम करे सो कायदा चाललंय याचा प्रत्यय येतो.राज्याचे मंत्री आणि भाजप नेते आशिष शेलार हे दोन दिवस लातूर दौऱ्यावर आले.मुख्य कार्यक्रम हा निलंगा येथील नीलकंठेश्वर मंदिराचा होता.सोबतच लातूर शहर आणि लातूर ग्रामीणची बैठक मेळावा ऐनवेळी शहर जिल्हाध्यक्ष अजित पाटील कव्हेकर यांनी ठेवला.आता लातूर शहर आणि लातूर ग्रामीणची संयुक्त बैठक,मेळावा असेल तर त्याला ग्रामीणचे जिल्हाध्यक्ष आणि ग्रामीणमध्ये येणाऱ्या आमदारांना स्थान असणे क्रमप्राप्त आहे.मात्र आशिष शेलार यांचा दौरा हायजॅक केल्याप्रमाणे झाला.आणि शेलार यांना कोणी तरी चावी देतंय आणि शेलार तेवढेच करतात असे या दौऱ्यात प्रकर्षाने जाणवले.आणि लातूर शहर आणि लातूर ग्रामीणच्या बैठकीला चक्क ग्रामीण जिल्हाध्यक्ष बसवराज पाटील यांना निमंत्रण देखील दिले गेले नाही.सोबतच औसा विधानसभा मतदारसंघाचे आमदार अभिमन्यू पवार व लातूर ग्रामीणचे आमदार रमेश कराड यांना सुद्धा या बैठकीत स्थान दिले गेले नाही.आणि लातूर ग्रामीणच्या अध्यक्षांना बैठकीत स्थान नसेल आणि लातूर ग्रामीणमध्ये येत असलेल्या मतदारसंघातील भाजप आमदारांना निमंत्रण दिले जात नसेल तर किती गटबाजी आणि नेतृत्वाची हुकूमशाही सुरू आहे याचा अंदाज नक्की येतो.आणि सर्वात कहर म्हणजे आशिष शेलार हे मुंबईहुन लातूरला विमानतळावर आल्यानंतर नियोजित दौऱ्यात बाभळगाव मार्गे निलंग्याला जाणार होते. याच रस्त्यावर राज्याचे कृषिमूल्य आयोगाचे अध्यक्ष ज्यांना कॅबिनेट दर्जा आहे त्या पाशा पटेल यांचे लोदगा येथे फिनिक्स फाऊंडेशन आहे.तेथे आशिष शेलार हे भेट देणार असे ठरले.आणि त्या अनुषंगाने पाशा पटेल हे आशिष शेलार यांना घेण्यासाठी विमानतळावर गेले.मात्र शेलार येताच गडबडीने ते गाडीत बसले,सोबत माजी मंत्री संभाजी निलंगेकर पाटील आणि शहर जिल्हाध्यक्ष अजित पाटील कव्हेकर गाडीत बसले.व फार उशीर झालाय असे पाशा पटेल यांना सांगण्यात आले.लोदगा येथे नियोजन केलेल्या पाशा पटेल यांनी भेट नाही तर नाही बाभळगाव मार्गेच शेलार जात असल्याने लोदगा पाटी येथे किमान स्वागत आणि सत्कार स्वीकारून पुढे मंत्री जातील या उद्देशाने पाशा पटेल यांनी शेलार यांना फोन केला,आणि साहेब,भेट नाही तर नाही माझी लोक लोदगा पाटीवर थांबले आहेत,त्यांचा सत्कार माझ्या वतीने किमान स्वीकारा अशी विनंती केली.मात्र लोदगा येथे पाशा पटेल यांचा सत्कार स्वीकारावा लागू नये म्हणून आशिष शेलार यांनी नियोजित असलेला मार्ग चक्क बदलला. शासकीय दौऱ्यात बाभळगाव मार्गे निलंगा असे ठरले असताना आशिष शेलार औसा मार्गे खराब रस्त्याने निलंग्याला गेले.उद्देश काय तर पाशा पटेल यांना भेट द्यायची नाही.आता आशिष शेलार यांनी मार्ग बदलला की गाडीत बसलेल्या अजित पाटील कव्हेकर आणि संभाजी निलंगेकर पाटील यांनी त्यांना मार्ग बदलायला लावला हे शेलार यांनाच ठाऊक.मात्र कांही दिवसापूर्वीच भाजप आमदार रमेश कराड यांनी आयोजित केलेल्या कार्यक्रमात पाशा पटेल यांनी जाहीर भाषणात अजित पाटील कव्हेकर आणखीन पिल्लू आहेत असा उल्लेख केला होता.तो राग ठेऊन शेलार यांच्या गाडीत बसलेले अजित पाटील कव्हेकर यांनी बदला घेतला की काय अशी प्रतिक्रिया आता समोर येते आहे.म्हणजे राज्याच्या कृषी मूल्य आयोगाचे अध्यक्ष,ज्याला कॅबिनेट दर्जा आहे,अल्पसंख्याक व शेतकरी चेहरा म्हणून ज्यांच्याकडे पाहिले जाते, त्यांच्याकडे मंत्री जाऊ नये म्हणून एवढे कट रचले जात असतील तर भाजपमध्ये काय चाललंय आणि आम्ही म्हणजे नेतृत्व ही जी हुकूमशाही चालली आहे त्यातून काय साध्य होईल हे भाजप श्रेष्ठींनाच माहिती.आणि सोबतच अजित पाटील कव्हेकर यांनी शहरात जी बैठक ठेवली आणि त्याला ग्रामीणचे जिल्हाध्यक्ष बसवराज पाटील मुरूमकर आणि दोन आमदारांना बोलवले नाही त्यामागे देखील बसवराज पाटील यांनी कांही दिवसांपूर्वी अजित पाटील यांना जाहीर झापले होते व झापत असताना माझ्याकडे यायचे असेल तर या नाहीतर तुम्ही तुमचे स्वतंत्र कार्यक्रम घ्या असा सल्ला दिला होता.त्याचे फार लवकर अनुसरन अजित पाटील कव्हेकर यांनी केल्याचे दिसून आले.नावाला लातूर ग्रामीणची बैठक असे दाखवले गेले मात्र जो संदेश द्यायचा तो अजित पाटील कव्हेकर यांनी दिला.आता अजित पाटील यांना हे कोण करायला सांगितले किंवा त्यांचा बोलविता धनी कोण आणि त्या धन्याचा उद्देश नेमका काय आहे हा संशोधनाचा भाग आहे.अजित पाटील कव्हेकर यांचे वडील माजी आमदार शिवाजीराव पाटील कव्हेकर हे सध्या सर्व कार्यक्रमात अध्यक्षाच्या पुढेच आहेत.शेलार यांच्या बैठकीला कव्हेकर नव्हते, ते मुंबईला पालकमंत्री यांच्याकडे होते. त्यामुळे ते येऊ शकले नाहीत.त्यामुळे अजित पाटील कव्हेकर यांचा बोलविता धनी कोण आहे तो भाग वेगळा मात्र त्या धण्याचा नेमका उद्देश काय हे भाजप श्रेष्ठीनी समजून घेण्याची गरज आहे.अन्यथा आगामी काळात या गटबाजी आणि नेतृत्वाची हुकूमशाही यामुळे डोळ्यादेखत वाटोळे झाले तर नवल वाटायला नको.



दरम्यान या सर्व विषयात औसा विधानसभा मतदारसंघाचे आमदार अभिमन्यू पवार यांनी बातमी मागची बातमीशी बोलताना स्पष्ट केले की राज्याचे मंत्री आशिष शेलार यांच्या उपस्थितीत लातूर शहर आणि लातूर जिल्हा भाजपची बैठक,मेळावा झाला याबाबत मला कसलीही कल्पना नव्हती.माझ्या मतदारसंघात आशिष शेलार यांचे जे कार्यक्रम होते त्याला मी उपस्थित होतो.मात्र लातूर शहरात झालेल्या पक्षाच्या बैठकीला मला या म्हणुन कोणीही निरोप दिला नाही.अगदी बैठक झाली असे मला प्रसारमाध्यमात पाहायला मिळाले.लातूर ग्रामिणची बैठक असेल तर जिल्ह्यातील एक लोकप्रतिनिधी या नात्याने आम्हाला ज्यांनी कोणी बैठक आयोजित केली आहे त्याने बोलवायला हवे होते.यापुढे जाऊन शहर हे जिल्ह्यात येते असे सांगत कदाचीत ज्यांनी बैठक बोलवली किंवा नियोजन केले त्यांच्या लेखी शहरात माझी गरज नाही असे त्यांना वाटत असावे किंवा ते कोणाच्या तरी हातचे बाहुले प्रमाणे निर्णय घेत असावे.यापुढे जावून या बैठकीला जर ग्रामीणचे जिल्हाध्यक्ष बसवराज पाटील मुरुमकर यांनाही निमंत्रण नसेल तर हे खुप भयानक आहे. बसवराज पाटील मुरुमकर ज्येष्ठ नेते असून लातूर जिल्ह्यातच लातूर शहर येते याचा बहुधा विसरच कांही मंडळींना पडलेला दिसतोय.

# केज येथे भव्य ग्रामीण कृषी प्रदर्शनाचे उद्घाटन

## ग्रामीण भागातील सर्वात मोठे कृषी प्रदर्शन शेतकऱ्यांसाठी पर्वणी

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

केज तालुक्यातील कृषिधन,शिंजीर मिल्क  ण्ड ग्रो प्रोडयुसर कंपनी केज यांच्या वतीने दि.७ ते ९ हे तीन दिवसीय कृषी प्रदर्शन विठाई मंगल कार्यालय येथे सुरू झाले. कृषी प्रदर्शनाची सुरुवात शालेय विद्यार्थी यांच्या शोभायात्रा काढून झाली. कृषी प्रदर्शनाचे उद्घाटन
खा.बजरंग सोनवणे, हवामान तज्ञ पंजाबराव डक,तालुका कृषी अधिकारी सागर पठाडे, पोलीस निरीक्षक स्वप्निल उनवणे,विकास मिरगणे, हनुमंत भोसले,यांच्या हस्ते व शेतकऱ्यांच्या उपस्थितीत भव्य कृषी प्रदर्शनाचे फीत कापून उद्घाटन झाले.
केज येथे भव्य ग्रामीण कृषी प्रदर्शनाचे उद्घाटन झाले.उद्घाटक खा.बजरंग सोनवणे म्हणाले की, ग्रामीण भागातील शेतकऱ्यांसाठी ही एक पर्वणी आहे शेतीसाठी आधुनिक तंत्रज्ञान वापरून उत्पादन वाढवता येईल.शेतकऱ्यांनी या कृषी प्रदर्शनास भेट देऊन तंत्रज्ञान अवगत करावे कृषी प्रदर्शन आयोजक कंपनीचे अभिनंदन करून केले.हवामान अभ्यासक पंजाबराव डक म्हणाले की,शेतकऱ्यांनी हवामाना च्या अंदाजानुसार आपलं पीक व्यवस्थापन करावे. तंत्रज्ञाना शिवाय शेतीला पर्याय उरलेला नाही.कमी खर्चात अधिक उत्पन्न घेण्यासाठी अभ्यासपूर्ण शेती करण्याची गरज असल्याचे मत व्यक्त केले. यावेळी उपस्थित त्यांनी प्रदर्शनाची पाहणी करून शुभेच्छा दिल्या.आज आणि उद्या दोन दिवस हे कृषी प्रदर्शन सर्वांसाठी खुले राहणार आहे. जिल्हयातील सर्व शेतकरी बांधव,महिला बचत गट, शेतकरी गट,व्यवसायीक यांनी या प्रदर्शनाचा लाभ घ्यावा असे आवाहन



कंपनीचे संचालक विशाल चौरे यांनी केले.
याप्रदर्शनात महाराष्ट्रातील शेतीशी निगडीतआधुनिक तंत्रज्ञान,पाणीव्यवस्थापन,पिक व्यवस्थापन या क्षेत्रात काम करणाऱ्या कंपन्या सहभागी झाल्या आहेत.केज तालुक्यात पहिल्यांदाच कृषी प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आल्याने अनेक शेतकऱ्यांनी,शेतकरी गटांनी कृषी प्रदर्शनास भेटी दिल्या.यामध्ये शिंजीर मिल्क ण्ड ग्रो प्रोडयुसर कंपनीने पुढाकार घेत या कृषी प्रदर्शनाचे आयोजन केले आहे.यामुळे केज तालुक्यातील तसेच बीड जिल्हयातील शेतकऱ्यांना आधुनिक तंत्रज्ञान समजून घेण्यासाठी येत आहेत प्रदर्शनामध्ये प्रगत शेती,मशिनरी,आधुनिक साधने,सुधारीत बीयाणे, खते,किटक नाशके,दुग्ध व्यवसाय या विषयी थेट प्रात्यक्षीके आहेत.हे प्रदर्शन शेतकरी, व्यापारी, विक्रेते, वैज्ञानिक, विदयार्थीयांच्या साठी एकव्यासपीठ म्हणुन उपलब्ध आहे. यामुळे आपल्या जिल्हया तील तसेच मराठवाडया तील शेतीतील व शेतीपुरक व्यवसायातील उत्पादनासाठी निश्चीतच मदत होईल.असे मत उपस्थितांनी व्यक्त केले हे कृषी प्रदर्शन मराठवाडयातील पारंपारीक शेतीचे देखावे हे या कृषी प्रदर्शनाचे खास आकर्षण ठरले आहे.पहिल्या कृषी प्रदर्शनात शेतकरी, महिला बचत गट, व्यावसायिक विद्यार्थी यांनी भेटी दिल्या आहेत.

# केज येथे सहाय्यक निबंधक पदी श्री.एस.डी.नेहरकर यांची नियुक्ती

## पत्रकार संघ व लेखा परीक्षक संघातर्फे सत्कार



दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

केज तालुक्यात सहाय्यक निबंधक सहकारी संस्था या पदावर श्री.एस.डी. नेहरकर यांनी नुकताच पदभार स्वीकारला आहे. शांत,संयमी,अभ्यासू, कायदे तज्ञ व कर्तव्यदक्ष अशा व्यक्तिमत्त्वासाठी ओळखले जाणारे श्री. एस.डी. नेहरकर हे impossible या शब्दा कडेही I am possible या सकारात्मक नजरेने पाहणारे अधिकारी म्हणून प्रसिध्द आहेत. या निमित्त महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ,मुंबई शाखा केज यांच्या वतीने श्री. चंद्रकांत पाटील तसेच प्रमाणित लेखापरीक्षक सहकारी संस्था,बीड यांच्या वतीने श्री.खोडसे सी.ए.,श्री.विठ्ठल मुळे व अभिषेक ताकतोडे यांच्या उपस्थितीत श्री.एस.डी. नेहरकर यांचा यथोचित सत्कार करण्यात आला. यावेळी केजतालुक्यातील विविध सहकार संस्था, पतसंस्था व अन्य सहकारी संस्थांच्या सध्याच्या कामकाजाचा आढावा घेण्यात आला. भविष्यात सहकार संस्था प्रगतीपथावर नेण्यासाठी सर्वतोपरी सहकार्य करू, असे आश्वासन श्री.एस.डी.नेहरकर यांनी या वेळी व्यक्त केले. कार्यक्रमाच्या शेवटी प्रमाणित लेखापरीक्षक सहकारी संस्था,बीड यांच्या वतीने श्री.खोडसे सी.ए.यांनी उपस्थित मान्यवरांचे आभार मानले आहेत.

# साने गुरुजी निवासी विद्यालय केज येथे कर्मचाऱ्यांसाठी विविध स्पर्धा संपन्न

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण संस्था, महाराष्ट्र राज्य पुणे यांच्या वतीने राज्यातील सर्व शाळांमधील शिक्षक, शिक्षकेत्तरकर्मचारी तसेच जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेच्या अधिकारी व कर्मचाऱ्यां साठी तसेच पर्यवेक्षीय यंत्रणेतील सर्व अधिकारी, कर्मचारी यांच्यासाठी विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले असून एकूण ४२ स्पर्धे पैकी ०८ स्पर्धा दि.७ नोव्हेंबर रोजी साने गुरुजी निवासी विद्यालय केजच्या मैदाना



वर या विविध क्रीडा स्पर्धेचे आयोजन गट शिक्षणाधिकारी कार्यालयाच्या वतीने करण्यात आले या स्पर्धेचे उद्घाटन गट शिक्षणाधिकारी सुनिल केंद्रे यांच्या हस्ते झाले या वेळी शिक्षकांना त्यांनी मार्गदर्शन करताना शिक्षकांना या माध्यमातून ही एक स्पर्धा नसुन शिक्षण क्षेत्रातील सर्वांसाठी एक संधी आहे यातुन त्यांना एन.ई.पी. २०२० च्या तत्वांना मुर्त स्वरूप देतील शिक्षकांचे व्यावसायिक सक्षमीकरण होण्यास मदत होईल. शिक्षकांना नवीनअध्यापन पद्धती,तंत्रज्ञानाचा वापर आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी आवश्यक असलेल्या कौशल्यांचा विकास करण्यास प्रोत्साहन मिळेल असे मत व्यक्त केले.यावेळी तालुक्यातील सहभागी शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते.या स्पर्धेचे पंच म्हणून नागरगोजे त्र्यंबक,शेप अरुण,विनोद गुंड,दिपक साखरे,घुले दत्तात्रय यांनी काम पाहिले कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.डॉ. कविताताई कराड मॅडम यांनी केले तर आभार प्रदर्शन दिपालीताई कांदे यांनी मानले.

# ठाण्यात ९ नोव्हेंबरला भारत मुक्ती मोर्चा आयोजित विशाल जन आक्रोश रॅली

दैनिक वादळ वार्ता
**ठाणे । प्रतिनिधी**

ठाण्यात ९ नोव्हेंबरला विशाल जन आक्रोश रॅलीचे आयोजन करण्यात आले आहे. भारत मुक्ति मोर्चा, राष्ट्रीय पिछडा वर्ग (OBC) मोर्चा, राष्ट्रीय परिवर्तन मोर्चा, बहुजन क्रांती मोर्चा आणि बुद्धिस्ट इंटरनॅशनल नेटवर्क यांच्या संयुक्त विद्यमाने आज ठाणे शहरातील वर्तक नगर येथे पत्रकार परिषद पार पडली. सदर पत्रकार परिषदेत विशाल जन आक्रोश रॅली संदर्भात घोषणा करण्यात आली. सदर रॅली ९ नोव्हेंबर २०२५ रोजी दुपारी १ वाजता वर्तक नगर, ठाणे येथून सुरु होऊन खारटन मार्गे कोर्ट नाका येथे समारोप होणार आहे. भारतातील सर्व निवडणुका या एतच् मशीनऐवजी बॅलेट पेपरवर घेण्यात याव्यात, इतर मागास प्रवर्ग (OBC) व इतर सर्व जातींची जातीनिहाय जनगणना करण्यात यावी, बोधगया येथील महाविहार हे बौद्ध समाजाच्या ताब्यात देण्यात यावे, आदिवासी समाजावर होणाऱ्या अन्यायाला पायबंद घालण्यात यावा, महिलांच्या सुरक्षेसाठी व सन्मानासाठी विशेष कायदे कठोरपणे लागू करण्यात यावेत,

# विद्यार्थ्यांनी भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या सारखे ज्ञान संपादन करावे-रानबा गायकवाड

## नवीन प्राथमिक शाळेच्या विद्यार्थ्यांनी साजरा केला ‘विद्यार्थी दिन’

दैनिक वादळ वार्ता
**परळी वैजनाथ । प्रतिनिधी**

जगातील सर्वोत्तम विद्यार्थी म्हणून महामानव, विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव घेतले जाते. त्यामुळे आजच्या विद्यार्थ्यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या सारखे ज्ञान संपादन करावे असे आवाहन जेष्ठ पत्रकार व साहित्यिक रानबा गायकवाड यांनी केले. येथील थर्मल वसाहतीतील नवीन प्राथमिक शाळेच्या विद्यार्थ्यांनी शुक्रवारी (दि.७) विद्यार्थी दिनानिमित्त रेल्वे स्थानक परिसरातील भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला अभिवादन करून विद्यार्थी दिन साजरा केला. यावेळी श्री गायकवाड बोलत होते.७ नोव्हेंबर हा दिवस विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा सातारा येथील प्रतापसिंह भोसले हायस्कूल मधील शाळा प्रवेश दिन देशात विद्यार्थी दिन म्हणून साजरा केला जातो. या निमित्ताने परळी येथील शक्तीकुंज



वसाहतीतील नवीन प्राथमिक शाळेच्या विद्यार्थ्यांनी हा दिवस डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करुन साजरा केला. यानिमित्त रेल्वे स्टेशन येथील विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यासमोरील प्रांगणात विद्यार्थी एकत्र आले होते. विद्यार्थ्यांनीच पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. त्यानंतर जेष्ठ पत्रकार व साहित्यिक रानबा गायकवाड, तसेच वैद्यनाथ बँकेचे माजी संचालक प्रा.दासू वाघमारे यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.यावेळी बोलतांना प्रा.दासू वाघमारे यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या सारखे शिक्षण घेऊन आपल्या शाळेचे व आई वडिलांचे नाव मोठे करण्याचे आवाहन केले. याप्रसंगी रानबा गायकवाड यांच्या वतीने विद्यार्थ्यांना पेन व वहीचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सुत्रसंचलन पर्यवेक्षक एल.आय.वाकडे यांनी केले. श्री शिंदे मोहेकर यांनीही यावेळी विचार मांडले. कार्यक्रमास शिक्षक सर्वश्री विनोद देशमुख, भागवत मुंडे, यांच्यासह शिक्षिका सौ.आर. आर.जाधव, सौ.आयोध्या राऊत, सौ.भाग्यश्री गंगणे, सौ.शुभांगी मुंडे यांच्यासह १७० विद्यार्थी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे संयोजन एल.आय.वाकडे यांनी केले. मुख्याध्यापक डी.जी.शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम पार पडला. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी श्री कांदे, बाळू बने, रणजीत घनघाव, श्री चांगिरे आदींनी परिश्रम घेतले. दरम्यान, यावेळी दिवाळीनिमित्त शाळेने आयोजित केलेल्या आकाश कंदिल बनवण्याच्या स्पर्धेतील विद्यार्थ्यांना श्री गायकवाड, श्री वाघमारे, एल.आय.वाकडे, श्री शिंदे यांच्या हस्ते पारितोषिकाचे वितरण यावेळी करण्यात आले.

# यश संतोष बारड यांचे सी.ए.परीक्षेत उत्तीर्ण

दैनिक वादळ वार्ता
**परळी वैजनाथ । प्रतिनिधी**

परळी शहरातील चि. यश संतोष बारड या विद्यार्थीने नुकत्याच झालेल्या सी.ए. परीक्षामध्ये घवघावीत यश मिळवळले. यश बारड हे सीए परीक्षेत उत्तीर्ण झाल्याबद्दल श्री संमर्थ शिक्षण प्रसारक मंडळ संचालक प्रभाकर जीवनसा पैंजणे यांनी शाल, पुष्पगुछ देऊन सत्कार करण्यात आला. चार्टर्ड अकाउंटंट कोर्सच्या अंतिम परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला असून यामध्ये बीड जिल्ह्यातील परळी वैद्यनाथ शहरातील यश बारड यांनी सी.ए. उत्तीर्ण झाले आहेत. त्यांनी मिळविलेल्या या घवघवीत यशाबद्दल सर्वत्र परिसरातून त्यांचे अभिनंदन व कौतुक केले जात आहे.
द इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकाउंटंट ऑफ इंडिया तर्फे परीक्षा घेतली जाते. चार्टर्ड अकाउंटंट कोर्स हा विश्वस्तरीय मान्यता असलेला कोर्स असल्याने त्याची परीक्षा ही अवघड समजली जाते. यश बारड यांनी सी.ए. होण्याचे स्वप्न उराशी बाळगून मेहनत केली आहे. जिद्द आणि मेहनतीच्या जोरावर त्यांनी हे यश मिळविले आहे'यशाचा मार्ग संघर्षातून जातो,' हे यश याने आपल्या कर्तृत्वाने सिद्ध



केले आहे. खडतर परिश्रमानंतर सीएहोण्याचे स्वप्न पूर्ण केले आहे. या उत्तुंग यशाबद्दल यश बारड यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी श्री समर्थ शिक्षण प्रसारक मंडळ संचालक प्रभाकर जीवनसा पैंजणे, गोपाळ बारड (आजोबा), मिरा बारड (आजी), संतोष बारड (वडिल), सोनाली बारड, (आई), श्रवणी बारड (बहीण), संजय कमळू, सविता कमळू, तुळशी कमळू, अभिषेक बारड हे उपस्थिती होते.

# पनवेल तालुक्यात कुष्ठरोग शोध मोहीम अभियानाचे आयोजन,आशा सेविका व स्वयंसेवक यांच्यावर जबाबदारी, एकूण ३ लाख ९३ हजार ६७९ लोकसंख्यंचे होणार सर्वेक्षण

दैनिक वादळ वार्ता
**पनवेल । प्रतिनीधी**

पनवेल तालुक्यात १७ नोव्हेंबर ते २ डिसेंबर २०२५ या कालावधीत कुष्ठरोग शोध मोहीम अभियान राबविण्यात येणार असून २०२७ पर्यंत जिल्हयात कुष्ठरोग्याची संख्या शून्यावर आणण्यासाठी अर्थात शून्य कुष्ठरुग्ण प्रसार हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी जिल्हा प्रशासन काम करीत आहे. या मोहिमेदरम्यान जिल्ह्यातील ग्रामीण भागातील लोकसंख्येचे १०० टक्के व शहरी भागातील जोखीमग्रस्त ३० टक्के लोकसंख्येचे प्रत्यक्ष तपासणी करण्यात येणार आहे. जिल्ह्यातील एकूण ७८ हजार ७३५ घरांना आशा सेविका व स्वयंसेवक भेटी देणार असून एकूण ३ लाख ९३ हजार ६७९ लोकसंख्यंचे सर्वेक्षण करण्यात येणार आहे. तरी या मोहिमेदरम्यान घरी येणाऱ्या आरोग्य पथकास सहकार्य करावे, असे आवाहन तालुका आरोग्य अधिकारी डॉ.अपर्णा खेडेकर* यांनी तालुक्यातील नागरिकांना केले आहे.

समाजातील निदान न झालेले कुष्ठरुग्ण लवकरात लवकर शोधून त्यांना त्वरित बहुविध औषधोपचाराखाली आणणे. नवीन कुष्ठरुग्ण शोधून बहुविध औषधोपचाराद्वारे संसर्गाची साखळी खंडित करुन होणारा प्रसार कमी करणे, समाजात कुष्ठरोगाविषयी जनजागृती करणे. सन २०२७ पर्यंत कुष्ठरोगाचा प्रसार रोखणे, हे ध्येय साध्य करण्याच्या दिशेने वाटचाल करणे. कुष्ठरोग हा मायक्रोबॅक्टेरियम लेप्रे नावाच्या जंतूमुळे होतो. या जंतूमुळे त्वचेवर, नास्तवर आणि शरीराच्या नसा इतर अवयववावर परिणाम होतो. या मोहिमेदरम्यान तालुक्यातील ग्रामीण भागातील लोकसंख्येचे १०० टक्के व शहरी भागातील जोखीमग्रस्त ३० टक्के लोकसंख्येचे प्रत्यक्ष तपासणी करण्यात येणार आहे. तालुक्यातील एकूण ७८ हजार ७३५ घरांना आशा सेविका व स्वयंसेवक भेटी देणार असून एकूण ३ लाख ९३ हजार ६७९ लोकसंख्यंचे सर्वेक्षण करण्यात येणार आहे. यासाठी एकूण २६० पथके व ५१ पर्यवेक्षवा यांची नेमणूक करण्यात आलेली आहे. सध्या पनवेल तालुक्यामध्ये ६५ कुष्ठरुग्ण औषधोपचाराखाली आहे. या मोहिमेदरम्यान आशा सेविका, स्वयंसेवक व आरोग्य कर्मचारी घरोघरी जावून सर्वेक्षण करून संशयित कुष्ठरुग्ण शोधणार असून नागरिकांनी आजाराबाबत गैरसमज व भीती न बाळगता घरी येणाऱ्या पथकाला सहकार्य करावे. तसेच जनजागृती, तपासणी व उपचार या त्रिसूत्रीने कुष्ठरुग्ण शोध अभियान यशस्वी करावे, असे आवाहन तालुका आरोग्य अधिकारी डॉ.अपर्णा खेडेकर यांनी केले आहे.

**कुष्ठरोगाची लक्षणे**

शरीराच्या कुठल्याही भागावर फिकट लालसर न खाजणारा बधीर चट्टा-डाग, त्या ठिकाणी घाम न येणे, जाड बधीर तेलकट त्वचा, त्वचेवर लहान लालसर गाठी असणे, कानाच्या पाळ्या जाड होणे, त्वचेवर थंड व गरम संवेदना न जाणवणे, भुवयांचे केस विरळ होणे, डोळे पूर्णपणे बंद करता न येणे, हातातून वस्तू गळून पडणे, चालताना पायातून चप्पल निसटणे, हाताची व पायाची बोटे वाकडे असणे,) हात मानेपासून पाय घोट्यापासून लुळा पडण

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077